# सांभाळा, विदेशी विद्यापीठं येताहेत !

परदेशी विद्यापीठ विधेयक मंजूर झालयं, विचार आला, खरच आपली विद्यापीठं या परदेशी विद्यापीठांना शह देऊ शकतील का ? उत्तर नकारार्थी आहे. भरपूर पैशाच्या जोरावर ही परदेशी विद्यापीठं खूप मोठ पायाभूत जाळं उभ करुन जातील, परदेशी नोकरीच्या लठ्ठ पगाराच्या नोकऱ्यांच्या प्रलोभनात, भारतीय विद्यार्थ्यांना आकृष्ट करतील आणि मग आजपासून वीस वर्षानंतरच खरं वास्तव बाहेर दिसेल. आपले तरुण दिशाहीन, लाचार, स्वत्व व आत्मविश्वास हरवलेले व नोकरीही गमावून बसलेले (Use & Throw मुळे) असे, तरुण नव्हे तर प्रौढ बाहेर पडतील.

हे असं, इतकं भीषण चित्र मला मांडावं लागतं आहे कारण हे विकसित, प्रगत व समृध्द देशच आज मंदीच्या विळख्यात व दहशतवादाच्या तडाख्यात सापडले आहेत. हे देश कसे आपल्याला देणार ताकदवान व सकस विद्यापीठ ? पण जर आपल्या भारतीय विद्यापीठांमध्येच सुधारणा घडवून आणल्या तर आपली विद्यापीठं या परदेशी विद्यापीठांपेक्षा उत्तम, जबाबदार, चारित्र्यवान, मूल्य जपणारी आणि याच बरोबर मेहनती, सामाजिक जाण असलेली व दिवसागणिक बदलत जाणाऱ्या, सामाजिक परिस्थितीला टक्कर देऊ शकणारी अशी सशक्त पीढी घडवू शकतील, आपल्या जवळ अभाव आहे तो फक्त इच्छाशक्तीचा व योग्य दिशेचा.

आपण संवेदनशील, सहनशील, सहिष्णु, मेहनती, दुसऱ्यांचा आदर करणारे असे मुळतः आहोतच आणि हीच आपली फार मोठी जमेची बाजू आहे. तेव्हा आपल्या विद्यापीठांचाच दर्जा आपल्याला उंचावता येणार नाही का ? अभिमानानं म्हणावसं वाटतं, भारतीय विद्यापीठ प्राचीन काळी उजवी होतीच व आज पण निश्चितच पुन्हा तोच प्रत्यय येईल, फक्त विद्यापीठांमध्ये ही उदासीनता का आली आहे व कशी दूर करता येईल, हा अभ्यास करुन त्या दिशेने पावले उचलावी लागतील.

विद्यापीठांना आज शिक्षणाचे कारखाने म्हणून संबोधल्या जातं व पदव्यांची

किमंत फक्त त्या कागदांएवढीच ठरते. पदव्या, ना चारित्र्य घडवंत, ना ताकद, ना नोकरी. सांगा तरुणांनी का घ्यायच्या विद्यापीठाच्या अशा या पदव्या ? पण जर हीच विद्यापीठ चारित्र्य घडविण्यासाठी ध्यान शिकवू लागली तर ? तर मग चारित्र्याबरोबर परिस्थितीशी सामना करण्यासाठी लागणारी ताकद व आत्मविश्वास ह्याच पदव्या देतील. या पदव्या नोकरी तर देतीलच पण स्वतंत्र व्यवसाय उभारण्यासाठी लागणारा आत्मविश्वास, चारित्र्याचं प्रामाणिकतेचं व सृजनशीलतेच पाठबळ पण देतील. मग आपल्याला परदेशी विद्यापीठांची गरजच भारणार नाही, कारण भारतीय विद्यापीठं त्यांच्या वरचढ ठरतील व आपल्या भारतीय विद्यापीठांना सोन्याची झळाळी प्राप्त होईल.

विद्यापीठाचा विषयच मनात घोळतोय तेव्हा कधीपासूनच एक विचार मनात डोकावतोय की आज किमान ४/५ वर्षे पदवीसाठी व २/३ वर्षे पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी खर्ची घालावी लागतात, पण जर दिवाळी व उन्हाळी सुट्ट्या, प्राध्यापकांच्या रजा आणि विद्यार्थ्यांच्या चाटा कमी केल्या व दर दिवसाचा वेळ योग्य रितीने वापरला तर ही वर्षे आज किमान अर्ध्यावर सहज आणता येतील, तेव्हा असा विचार करायला काय हरकत आहे ? आणि विद्यार्थी ऐन तारुण्याच्या भरात १७/१८ व्या वर्षीच परिपूर्ण अशी पदवी घेऊन बाहेर पडलीत तर यशाची उत्तुंग भरारी घेऊन आपल्या देशाचं नाव उज्ज्वल करतील.

असा एक प्रश्न पुढे येतो आहे, १७/१८ व्या वर्षीच जर तरुणांच शिक्षण पूर्ण झालं तर नोकऱ्यांचा भलामोठा प्रश्न उभा राहिल, त्याच उत्तर काय ? मला जे समजलं आणि उमगलं ते असं की तुम्ही या तरुणांना नोकऱ्या देण्याच्या फंदात पडूच नका. सृजनशीलतेमुळे तेच त्यांची नोकरी, व्यवसाय शोधतील व जास्त सक्षमपणे उभे राहतील.

दुसरी शंक, येवढ्या लवकर हातात पैसा व सत्ता आली तर त्याचे दुष्परिणाम उद्‌भवतील. या पृथ्वीवर निसर्गाने प्रत्येकाच्या गरजा भागवण्याकरता पुरेसे निर्माण केले आहे, पण तुमची ‘हाव’ पुरी करण्याकरता नव्हे. ‘Everything is enough here to fulfill everybody’s need, but not the greed.’ तेव्हा निर्धास्त रहा, कारण ‘ध्यान’ ही हावच (Greed)

निर्माण होवू देणार नाही.

आज विद्यापीठं विद्यार्थ्यांना फक्त माहिती देतात व घडतात कारकून. त्यांना ज्ञान व माहिती, यातला फरकच कळत नाही. पुस्तकं देतात ती माहिती, ज्ञान नव्हे. ज्ञानासाठी लागणारं पायाभूत जाळं विद्यापीठांना उभारावं लागेल. तेव्हाच विद्यार्थी अध्यात्मिक शिक्षणाचे धडे संपादन/आत्मसात करु शकतील कारण ज्ञानाचा स्त्रोत प्रत्येकाच्या आतच आहे पुस्तकात नव्हे. हा प्रयोग एखाद्या तरी विद्यापीठाने राबवावा अशी माझी आतंरिक इच्छा आहे. बघा, विद्यापीठं ज्ञानाच्या खाणी ठरतील व वैभवशाली भारत घडेल.

दिनांक : ३०/०९/२०११